महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/मान्यता/२०२४/2461

दिनांक : ०६.२०२४ 19 JUN 2024

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त विद्यमान तसेच प्रस्तावित नवीन सर्व पदवी
बी.बी.ए./बी.सी.ए./बी.एम.एस.अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षापासून राज्यातील BBA, BBM, BMS, BCA या अभ्यासक्रमांचे प्रवेश उच्च शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रनाखाली सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे करण्यास मान्यता देणेबाबत..**

**संदर्भ** :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचे पत्र क्र सीईटी२३२४/प्र.क्र.१२४/७६६७७०/ मशि-२ दि. १२.०६.२०२४

२. संचालनालयाचे पत्र क्र २ एनजीसी/BBA_BMS_BCA/प्रवेश/२०२४/३७१ दि. १४.०६.२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाने मा.संचालक,उच्च शिक्षण म.रा. पुणे यांना उद्देशून लिहिलेल्या संदर्भ क्र. ०१ च्या पत्राची प्रत संचालनालयास अग्रेषित केली आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर शासन पत्रान्वये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील बी.बी.ए.,बी.बी.एम.,बी.एम.एस.,व बी.सी.ए. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उच्च शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या मार्फत सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे राबविण्यात येणार आहे.

सबब विद्यमान बी.बी.ए.,बी.बी.एम.,बी.एम.एस.,व बी.सी.ए. संस्थांनी तसेच प्रस्तावित नवीन संस्थांनी पुढील कार्यवाहीसाठी मा.संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

**सोबत :- संदर्भीय पत्र**

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/BBA_BMS_BCA/प्रवेश/२०२४/३८९ दिनांक : 14 JUN 2024

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर,
अमरावती व नागपूर.

विषय: सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस. व बी.सी.ए.या अभ्यासक्रमांचे प्रवेश उच्च् शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यास मान्यता देणेबाबत...

संदर्भ: १. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक -२०२४/प्र.क्र.०२/विशि-३ दि.१२.१.२०२४
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/मान्यता/BBA_BMS_BCA/२०२४/२७,दि. १७.१. २०२४
३.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. सीईटी २३२४/ प्र.क्र.१२४/ ७६६७७०/ मशि-२, दिनांक १२ .६. २०२४.

वरील विषयाबाबत संदर्भाधीन दिनांक १२.१.२०२४ रोजीच्या शासन पत्रासोबत जोडलेल्या इतिवृत्तात नमूद केल्यानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने बी.बी.ए./ बी.सी.ए./ बी.एम.एस. या अभ्यासक्रमांची मान्यता प्रक्रिया त्यांच्या अखत्यारीत आणलेली असल्यामुळे सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबतची नियमावली तंत्रशिक्षण संचालनालयाने शासनाकडे मान्यतेकरिता तातडीने सादर करावी व तसे प्रवेश नियामक प्राधिकरणाला (CET) ला कळवावे. तसेच ज्या ज्या संस्था सदर अभ्यासक्रमास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त करतील अशा संस्थांच्या या अभ्यासक्रमांचे नियंत्रण तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत करावे असे स्पष्ट केले होते. त्यानुसार बी.बी.ए./ बी.एम.एस./ बी.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करण्यासाठी तसेच विद्यमान संस्थेमध्ये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस. व बी.सी.ए. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनाची मान्यता / शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याकरीताचा प्रस्ताव संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचेकडे सादर करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाकित दिनांक १७.१.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस. व बी.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यमान / प्रस्तावित नवीन संस्था यांना कळविण्यात आले होते.

तथापि, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाने मा.संचालक, उच्च शिक्षण म.रा., पुणे यांना उद्देशून लिहिलेल्या संदर्भ क्र. ३ च्या पत्राची प्रत संचालनालयास अग्रेषित केली आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर शासन पत्रान्वयें सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील बी.बी.ए.,

बी.बी.एम., बी.एम.एस., व बी.सी.ए. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उच्च् शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या मार्फत सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे राबविण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तरी आपल्या कार्यक्षेत्रातील विद्यमान बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस. व बी.सी.ए. संस्थांना तसेच प्रस्तावित नवीन संस्थांना संदर्भांकित पत्राची प्रत आपले स्तरावरुन अग्रेषित करुन, पत्रातील निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात यावे.

(डॉ.सुनिल भामरे)
सहसंचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत : १.मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित

२. अवर सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मशि-२,मंत्रालय,मुंबई यांना माहितीसाठी

F:\BUDAGE 2024-25 BBA BMS BCA BBA BCA to Higher Education letter.docx

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दुरध्वनी क्र. -०२२-२२७९३१७१ ई-मेल -mashi2-hted@mah.gov.in

---

क्रमांक : सीईटी २३२४/प्र.क्र.१२४/७६६७७०/मशि-२, दिनांक: १२ जुन, २०२४

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :-** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस. व बी.सी.ए. या अभ्यासक्रमांचे प्रवेश उच्च शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे करण्यास मान्यता देणेबाबत.

**संदर्भ :-** पत्र क्र. विधी ५०२४/प्र.क्र.१७/सीईटीसेल/२५११ दि. २४.४.२०२४

महोदय,

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधीन पत्रान्वये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावबाबत कळविण्यात येते की, विधी ३ वर्ष व विधी ५ वर्ष तसेच शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र या व्यावसायिक अभ्यासक्रमांची सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ही शासन अधिसुचना दि. ५.५.२०१७ अन्वये विहीत केलेल्या नियमानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली आयुक्त, सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत राबविण्यात येते. त्यानुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस. व बी.सी.ए. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उच्च शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या मार्फत सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

(हे.सु.पाठक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, न्यु एक्सलसिअसर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

E:\Jagtap\2024\Letter.docx